| धाराशिव | वर्ष २५ वे | अंक ३०७ वा | गुरूवार दिनांक २६ फेब्रुवारी, २०२६ | पृष्ठे ६ | किंमत ०१ ₹ RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## क्राईम न्युज

### लाखाच्यावर मोबाईल चोरले

तुळजापूर (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी आप्पाराव बिरु धर्मसाले, वय ३७ वर्षे, रा. तीर्थ बु. ता. तुळजापूर जि. धाराशिव यांचे तीर्थ बुद्रुक गावातील इंद्रकृष्ण नावाचे हॉटेलचे शटरचे लॉक अज्ञात व्यक्तीने दि.२१.०२.२०२६ रोजी तोडून आत प्रवेश करुन रोखरक्कम १,००,०००मोबाईल फोन, साहित्य असा एकुण १,०५,००० किंमतीचा चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- आप्पाराव धर्मसाले यांनी दि.२४.०२.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन तुळजापूर पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३३१(१),३०५ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### सोयाबिनच्या कट्ट्याची चोरी

वाशी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी नामे- सुदाम माणिक भैरट, वय ७० वर्षे, रा. शेलगाव ता. वाशी जि. धाराशिव यांचे राहते घराचे कुलूप अज्ञात व्यक्तीने दि.२१.०२.२०२६ रोजी तोडून आत प्रवेश करुन घरातील सोयाबीनचे ८ कट्टे एकुण ४०,००० किंमतीचे चोरुन नेले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-सुदाम भैरट यांनी दि.२४.०२.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन वाशी पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३३१(४), ३०५(क) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### पंचवीस लाखाच्या टॅंकरची चोरी

उमरगा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी नामे एम व्यंकटेश्वरलु आयलय्या मैदम, वय ४० वर्षे, रा. घरनं १५/९८ बाल नगर हनुमान मंदीर जवळ आयडीपीएल हैद्राबाद ता. जि. हैद्राबाद यांचा अंदाजे २५,००,००० किंमतीचा टॅंकर क्र टीएस युएच४०७७ पांढरे रंगाचा हा दि.२३.०२.२०२६ रोजी २२.०० ते २२.१० वा. सु. उमरगा येथील जकेकुर शिवारातील जयभवानी ढाबा येथुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-एम व्यंकटेश्वरलु मैदम यांनी दि.२४.०२.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन उमरगा पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

### पत्नीच्या पर्समधील रोख रक्कम व मोबाईलची चोरी

तुळजापूर(प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी अनिल सितारामराव कांबळे, वय ५५ वर्षे, रा. आयोध्या नगर, हाडको तुळजापूर ता. तुळजापूर जि. धाराशिव हे व त्यांची पत्नी हे श्रीनाथ मंगल कार्यालय नळदुर्ग रोड तुळजापूर येथे लग्नासाठी गेले असता फिर्यादी यांचे पत्नीचे पर्स मधील रोख रक्कम ७०,०००, मोबाईल फोन २ असा एकुण ८६,००० किंमतीचा अज्ञात व्यक्तीने चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी दिल्याने तुळजापूर पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे. या प्रकरणी पोलिस अधिक तपास करीत आहेत.

## तुळजापूर येथे श्री तुळजाभवानी कृषी महोत्सवात आधुनिक तंत्रज्ञान, तज्ज्ञ मार्गदर्शन व ७५ स्टॉल्सच्या माध्यमातून बळीराजाला नवे बळ



धाराशिव (जिमाका)- महाराष्ट्र शासन कृषी विभाग,आत्मा विभाग आणि महिला आर्थिक विकास महामंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'श्री तुळजाभवानी कृषी महोत्सव २०२६'चा आज तुळजापूर येथे उत्साहात शुभारंभ झाला.पालकमंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्ते ऑनलाईन पद्धतीने महोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले.२४ व २५ फेब्रुवारीदरम्यान सैनिक विद्यालय मैदान,नळदुर्ग रोड,तुळजापूर येथे हा महोत्सव पार पडत असून जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने या महामेळाव्यात सहभागी व्हावे,असे आवाहन पालकमंत्र्यांनी यावेळी केले.

हवामान बदल,वाढता उत्पादन खर्च आणि बदलती बाजारपेठ या आव्हानांचा सामना करण्यासाठी शेतकऱ्यांना सक्षम करणे हा या महोत्सवाचा मुख्य उद्देश असल्याचे पालकमंत्री सरनाईक यांनी स्पष्ट केले.आधुनिक शेती तंत्रज्ञान,पीक व्यवस्थापन,सेंद्रिय शेती,प्रक्रिया उद्योग आणि बाजारपेठेतील संधी याबाबत तज्ज्ञांकडून मार्गदर्शन मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी श्री.कीर्ती किरण पुजार यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व प्रतिमा पूजन करून पहिल्या दिवसाच्या कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली.यावेळी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राजकुमार मोरे,टाटा इन्स्टिट्यूटचे संचालक श्री. बाळ राक्षसे,उपजिल्हाधिकारी श्री. सागर नन्नावरे,तहसीलदार श्री.बोलंगे आत्माचे प्रकल्प संचालक श्री. मिसाळ,उपविभागीय कृषी अधिकारी श्री.महादेव आसलकर यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आबासाहेब देशमुख,तालुका कृषी अधिकारी तुळजापूर यांनी केले.

महोत्सवात एकूण ७५ स्टॉल्स उभारण्यात आले असून त्यात शासकीय,निमशासकीय विभाग, महिला बचत गट तसेच विविध संस्थांचा सहभाग आहे.३० शासकीय दालनांमधून कृषी, महसूल,पशुसंवर्धन,जलसंधारण तसेच महिला व बालकल्याण विभागांच्या योजना एकाच छताखाली उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.ड्रोन तंत्रज्ञान,कृत्रिम बुद्धिमत्ता (-ख) आणि कृषी यांत्रिकीकरण यांसारख्या आधुनिक तंत्रज्ञानावर विशेष भर देण्यात आला आहे.सोयाबीन,हरभरा,ऊस,रेशीम आणि आंबा यांसारख्या पिकांच्या लागवडीपासून प्रक्रिया व निर्यातीपर्यंत तज्ज्ञ मार्गदर्शन उपलब्ध आहे.'उत्पादक ते ग्राहक' या संकल्पनेतून थेट विक्री दालनांमुळे शेतकऱ्यांना मध्यस्थांशिवाय बाजारपेठ उपलब्ध झाली आहे.

उद्घाटनानंतर जिल्हाधिकारी श्री. पुजार यांनी महोत्सव परिसराची पाहणी करून विविध स्टॉल्सना भेट दिली व शेतकऱ्यांशी संवाद साधत आधुनिक शेती व कृषी पर्यटनाबाबत पुढाकार घेण्याचे आवाहन केले. जिल्ह्यातील कृषी क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या १८ शेतकरी व शेतकरी गटांचा सहकुटुंब सत्कार करण्यात आला.तसेच कृषी यांत्रिकीकरण योजनेंतर्गत ५० कृषी यंत्रांचे प्रातिनिधिक वितरण करण्यात येणार आहे.महिलांचाही मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवला गेला.

पहिल्या दिवशी आयोजित परिसंवादात एआयद्वारे ऊस व्यवस्थापन (श्री.पांडुरंग आवाड), निर्यातक्षम केळी लागवड (श्री. किरण डोके),रेशीम शेतीतील संधी (डॉ. चंद्रकांत लटपटे) आणि बायोचार निर्मिती (श्री.विनायक पाटील) या विषयांवर तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले.हजारो शेतकऱ्यांनी विविध प्रदर्शने,स्टॉल्स व नाविन्यपूर्ण अवजारे पाहण्यासाठी गर्दी केली. दरम्यान,कुंभारी येथील शेख यांनी सुमारे ८० किलो वजनाच्या बकऱ्यासह लावलेला स्टॉल विशेष आकर्षण ठरला.

उद्या २५ फेब्रुवारी सकाळी ११ वाजता डॉ.श्रीकृष्ण झगडे यांचे आंबा मोहर व्यवस्थापन व डॉ. अरुण गुट्टे यांचे रब्बी पीक व्यवस्थापन या विषयांवर मार्गदर्शन होणार असून दुपारी २ वाजता समारोप समारंभ होणार आहे. एकूणच,जिल्हास्तरीय कृषी महोत्सवामुळे प्रत्येक जिल्ह्यातील शेती अधिक उत्पन्नक्षम,शाश्वत व स्पर्धात्मक होण्याचा विश्वास व्यक्त केला जात आहे.

## गर्भाशय मुखाच्या कर्करोगावरील लस मुलींना मोफत द्यावी, खा. ओम राजे निंबाळकर यांच्या मागणीला यश




नवी दिल्ली / धाराशिव(प्रतिनिधी)- महिलांच्या आरोग्य सुरक्षेसाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेत केंद्र सरकारने देशभरातील १४ वर्षांच्या मुलींना मोफत एचपीव्ही (क्रीरप झरळिश्रश्रेरींळीीी) लसीकरण कार्यक्रमास मंजुरी दिली आहे. हा निर्णय खा. ओम राजे निंबाळकर यांनी सातत्याने केलेल्या पाठपुराव्याचे फलित मानल जात आहे.

दिनांक १९ डिसेंबर २०२५ रोजीच्या लोकसभेच्या कामकाजात अनुक्रमांक १५५ अंतर्गत विधेयक क्र. १९२/२०२५ म्हणून खासदार निंबाळकर यांनी खाजगी विधेयक सादर केले होते. या विधेयकाद्वारे देशातील १४ वर्षाखालील मुलींना गर्भाशय मुखाच्या कर्करोगापासून संरक्षण मिळावे यासाठी एचपीव्ही लस राष्ट्रीय स्तरावर मोफत उपलब्ध करून देण्याची ठोस मागणी करण्यात आली होती.

गर्भाशय मुखाचा कर्करोग हा भारतातील महिलांमध्ये आढळणाऱ्या प्रमुख कर्करोगांपैकी एक आहे. एचपीव्ही विषाणूमुळे होणाऱ्या या आजारावर प्रभावी प्रतिबंधक उपाय म्हणून लसीकरणाला जागतिक स्तरावर मान्यता आहे. संसदेत मांडलेल्या या विषयाकडे केंद्र सरकारने गांभीर्याने लक्ष देत अखेर देशव्यापी मोफत लसीकरण कार्यक्रम जाहीर केला आहे.

कार्यक्रमाची प्रमुख वैशिष्ट्ये

* देशभरातील १४ वर्षांच्या सर्व मुलींना मोफत एचपीव्ही लस
* सरकारी रुग्णालये, जिल्हा रुग्णालये, समुदाय आरोग्य केंद्रे व आयुष्मान आरोग्य मंदिरांमार्फत अंमलबजावणी गर्भाशय मुखाच्या कर्करोगाच्या प्रतिबंधासाठी दीर्घकालीन संरक्षण
* या निर्णयाचे स्वागत करत खासदार ओम राजे निंबाळकर म्हणाले, १९ डिसेंबर २०२५ रोजी लोकसभेत मांडलेल्या विधेयक क्र. १९२/२०२५ च्या माध्यमातून मी देशातील मुलींच्या आरोग्य सुरक्षेचा मुद्दा उपस्थित केला होता. केंद्र सरकारने सकारात्मक निर्णय घेतल्याबद्दल मी पंतप्रधान व केंद्रीय आरोग्य मंत्री यांचे आभार मानतो.

या निर्णयामुळे देशातील ग्रामीण व शहरी भागातील १ कोटी २५ लाख मुलींना प्रतीवर्ष मोफत आणि सुरक्षित आरोग्य संरक्षण उपलब्ध होणार असून, महिलांच्या आरोग्याच्या दृष्टीने हा ऐतिहासिक टप्पा ठरणार आहे.

## अवकाळी पावसातच कळंब बसस्थानक जलमय! जागोजागी खड्डे; प्रवाशांच्या जीवितास धोका - प्रशासनाचे अक्षम्य दुर्लक्ष



कळंब (प्रतिनिधी) : अवकाळी पावसाच्या पहिल्याच सरीत कळंब येथील बसस्थानकाची दयनीय अवस्था पुन्हा एकदा उघड झाली. संपूर्ण परिसरात पाणी साचल्याने स्थानक अक्षरशः तुंबले असून जागोजागी पडलेल्या मोठमोठ्या खड्ड्यांमुळे प्रवाशांच्या जीवितास गंभीर धोका निर्माण झाला आहे.

बसस्थानक परिसरात डांबरीकरण पूर्णपणे उखडले असून ठिकठिकाणी खोल खड्डे पडले आहेत. पावसाचे पाणी साचल्यामुळे हे खड्डे दिसून येत नाहीत. त्यामुळे प्रवासी, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच शालेय विद्यार्थी घसरून पडण्याच्या घटना घडत आहेत. वाहनचालकांनाही बस वळवताना मोठी कसरत करावी लागत आहे.

स्थानिक नागरिक व आस्थापनाधारकांनी अनेकदा प्रशासनाकडे तक्रारी व निवेदने दिली आहेत. मात्र, लवकरच दुरुस्ती करू या आश्वासनांपलीकडे कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. परिणामी उन्हाळ्यात धुळीचा त्रास आणि पावसाळ्यात चिखल व साचलेल्या पाण्याचा त्रास असा दुहेरी फटका व्यापारी व प्रवासी सहन करत आहेत.

विशेष म्हणजे, कळंब हे तालुक्याचे मुख्य ठिकाण असून दररोज शेकडो प्रवासी या स्थानकातून प्रवास करतात. तरीही मूलभूत सुविधांकडे होत असलेले दुर्लक्ष संतापजनक आहे. एखादी दुर्घटना घडल्यावरच प्रशासनाला जाग येणार का, असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

तात्काळ खड्डे बुजवून पावसाच्या पाण्याचा निचरा करण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशाराही स्थानिकांकडून देण्यात आला आहे.

## प्राण्यांना निर्दयपणे वागणुक देवून वाहतुक करणाऱ्यावर गुन्हा दाखल

धाराशिव (प्रतिनिधी)- वाशी पोलीस ठाणे अंतर्गत पोलिसाकडून समजलेली माहिती अशी की, गौतम मधुकर गायकवाड, वय २६ रा. तांदुळवाडी ता. वाशी जि.धाराशिव यांनी दि. २३.०२.२०२६ रोजी २३.४५ वा. सु. सरमकुंडी फाटा येथे पिकअप क्र एमएच १३ डीक्यु १६५६ मध्ये गोवंशीय जातीचे तीन बैल एकुण ७५,००० किंमतीचे गोवंशीय जातीचे जनावरे त्यांचे चारा पाण्याची व्यवस्था न करता निर्दयतेने कत्तलीसाठी बेकायदेशीर रित्या वाहतुक करत असताना वाशी पोलीसांना मिळून आले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे नमूद व्यक्तींविरुध्द प्राण्यास क्रुरतेने वागण्यास प्रतिबंध अधिनियम कलम ११(१),११(१)(अ), ११(१)(एच), ११(१)(एफ),११(१)(आय) सह ५(ए),५(ब), ९(ब), ११ पशु संरक्षण अधिनियमसह ४७, ५४, ५६ प्राण्याचे परिवहन अधिनियम अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

तसेच भुम पोलीस ठाणे अंतर्गत खलील हाफीज खॉं पठाण, रा. भोनगिरी ता.भुम जि.धाराशिव यांनी दि. २३.०२.२०२६ रोजी २२.०८ वा. सु. भोनगिरी येथे वाहना मध्ये तीन जर्शी कालवड, एक खोंड,एक जर्शी गाय, दोन गावरान गाईचे खोंड, एक काळ्या रंगाची कालवड एकुण ४६,००० किंमतीची गोवंशीय जातीचे जनावरे त्यांचे चारा पाण्याची व्यवस्था न करता निर्दयतेने कत्तलीसाठी बेकायदेशीर रित्या वाहतुक करत असताना भुम पोलीसांना मिळून आले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे नमूद व्यक्तींविरुध्द प्राण्यास क्रुरतेने वागण्यास प्रतिबंध अधिनियम कलम ११(१)(फ), ११(१)(एच) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

या दोन्ही प्रकरणी पोलिस अधिक तपास करीत आहेत.

## प्रोजेक्ट अमरीत अंतर्गत हातलाई देवी येथे तळे स्वच्छता अभियान !



कळंब (प्रतिनिधी)- सद्गुरू माता सुधीक्षा जी महाराज यांच्या कृपा आशीर्वादाने संत निरंकारी मिशनच्या प्रोजेक्ट अमरीत - स्वच्छ जल, स्वच्छ मन या उपक्रमांतर्गत हातलाई देवी, धाराशिव येथे तळे स्वच्छता अभियान उत्साहात पार पडले. या सेवेच्या उपक्रमात धाराशिव शाखेचे संत महापुरुष, माता बहिणी (साध संगत) तसेच युनिट क्रमांक ९७३ चे सेवादल महापुरुष व बहिणींनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. सर्वांनी श्रमदान करत तळ्यातील गाळ, प्लास्टिक व इतर कचरा काढून परिसर स्वच्छ केला.

स्वच्छ जल, स्वच्छ मन हा संदेश प्रत्यक्ष कृतीतून समाजापर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न या उपक्रमातून करण्यात आला. पर्यावरण संवर्धन आणि जलस्रोतांचे जतन ही काळाची गरज असून, समाजाने अशा उपक्रमांत सहभागी व्हावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

सेवेच्या या कार्यातून भक्तांनी सेवेचा आनंद घेत धन निरंकारचा जयघोष करत पर्यावरण रक्षणाचा संकल्प व्यक्त केला.

## जागतिक सामाजिक न्याय दिनानिमित्त बालविवाहविरोधी जनजागृती ; विद्यार्थ्यांना कायदेविषयक मार्गदर्शन

धाराशिव दि.२४ फेब्रुवारी (जिमाका) जागतिक सामाजिक न्याय दिन (२० फेब्रुवारी) निमित्त जिल्हा विधी सेवा प्राधिकरण,धाराशिव आणि श्रीपतराव भोसले माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमाने बालविवाहमुक्त भारत आपला संकल्प अभियान व कायदेविषयक जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन विद्यालयात करण्यात आले.हा कार्यक्रम जिल्हा विधी सेवा प्राधिकरण अध्यक्षा तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीमती अभिश्री देव यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षा न्या.भाग्यश्री पाटील यांनी विद्यार्थ्यांना बालविवाह म्हणजे काय याची सविस्तर माहिती दिली.आपल्या गावात,शेजारी किंवा नातेवाईकांमध्ये बालविवाह होत असल्यास तो त्वरित रोखावा,असे आवाहन त्यांनी केले.

बालविवाहाबाबत माहिती देण्यासाठी १०९८ या मोफत मदत क्रमांकावर संपर्क साधावा किंवा पोलिसांना कळवावे,असेही त्यांनी सांगितले.

बालकांवरील लैंगिक अत्याचार रोखण्यासाठी समाजातील प्रत्येकाने सजग राहणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.एखाद्या मुलीला किंवा मुलाला अश्लील व्हिडीओ दाखवणे,अयोग्य हातवारे करणे यांसारखी कृत्ये बाललैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा असल्याची माहिती त्यांनी दिली.तसेच राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणाच्या विविध योजना व 'नालसा-मुलांसाठी बालस्नेही कायदेविषयक सेवा योजना, २०२४' याबाबत विद्यार्थ्यांचे प्रबोधन करण्यात आले.

यावेळी विद्यालयाचे प्राचार्य नंदकुमार नन्नवरे,उपप्राचार्य संतोष घासे, उपमुख्याध्यापक प्रमोद कदम,ड. विश्वजीत शिंदे (पॅनल विधिज्ञ) व्यासपीठावर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहशिक्षक एस.सी.पाटील यांनी केले,तर कार्यक्रमाच्या फलप्राप्तीचे महत्त्व अधोरेखित करत आभार प्रदर्शन के.पी.पाटील यांनी मानले.

कार्यक्रमास प्रशालेतील शिक्षक, विद्यार्थी तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे कर्मचारी उपस्थित होते.

